LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th November 2018.

NOTIFICATION

GRAM NYAYALAYAS ACT, 2008.

No. EST. 2018/CR-56/Desk-XII.— Whereas, the Government of Maharashtra by Government Notification, Law and Judiciary Department, No. CRC-2009/(37)/D-XII, dated 29th September 2009 has, in exercise of the powers conferred by section 3 of the Gram Nyayalaya Act, 2008 (4 of 2009) in its application to the State of Maharashtra, and after consutation with the High Court of Judicature at Bombay, established the Gram Nyayalaya for the village panchayat at the intermediate level, *i.e.* for Panchayat Samiti area of Korpana, sub-ordinate to the District Court of Chandrapur, in Chandrapur District with effect from the 2nd October 2009 ;

And whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department, No. EST. 2018/CR-56/D-XII, dated the 20th June 2018 has, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 11 of the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974) and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf and of all other powers enabling in that behalf, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established, for functioning as a regular Court of Judicial Magistrate, First Class, Korpana, with effect from the 23rd June 2018 ;

And whereas, as the regular Court of Judicial Magistrate, First Class, Korpana, is functioning for the respective jurisdiction, the Government of Maharashta considers it expedient to direct that the Gram Nyayalaya for Panchayat Samiti area of Korpana shall cease to function ;

And whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department, No. EST. 2018/CR-56/D-XII, dated the 20th June 2018 has, in exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf and of all other powers enabling in that behalf, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established, for functioning as regular Court of Civil Judge (Junior Division), Korpana, with effect from the 23rd June 2018 ;

And whereas, as the regular Court of Civil Judge (Junior Division), Korpana is functioning for the respective jurisdiction, the Government of Maharashtra considers it expedient to direct that the Gram Nyayalaya for Panchayat Samiti area of Korpana shall cease to function.

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 21 of the General Clauses Act, 1897 (10 of 1897) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, with effect from the 23rd June 2018, rescinds the Government Notification, Law and Judiciary Department, No. CRC. 2009/(37)/D-XII, dated the 29th September 2009.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. KALOTI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHBIL /2009/31733

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक १२३(२)] मंगळवार, नोव्हेंबर ६, २०१८/कार्तिक १५, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २१०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ नोव्हेंबर २०१८

अधिसूचना

ग्राम न्यायालय अधिनियम, २००८.

क्रमांक इएसटी. २०१८/प्र.क्र. ५६/का-बारा.— ज्याअर्थी, ग्राम न्यायालय अधिनियम, २००८ (२००९ चा ४) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी. २००९/(३७)/डी-१२, दिनांक २९ सप्टेंबर, २००९ याद्वारे, दिनांक २ ऑक्टोबर २००९ पासून चंद्रपूर जिल्ह्यात मध्यम पातळीवरील ग्रामपंचायतीकरिता म्हणजेच, कोरपना पंचायत समिती क्षेत्राकरिता जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांस दुय्यम असलेले एक ग्राम न्यायालय स्थापन केले आहे ;

आणि ज्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्र. इएसटी. २०१८/प्र. क्र. ५६/कार्या-१२, दिनांक २० जून २०१८ याद्वारे, दिनांक २३ जून २०१८ पासून कोरपना येथे नियमित न्यायालय म्हणून कार्य करण्यासाठी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय स्थापन केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरपना यांचे नियमित न्यायालय हे, संबंधित अधिकार क्षेत्रासाठी कार्य करीत असल्यामुळे, महाराष्ट्र शासनास, कोरपना पंचायत समिती क्षेत्राकरिताचे ग्राम न्यायालय कार्यरत करण्याचे बंद होईल, असा निदेश देणे इष्ट वाटते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याच्या कलम २१, २२अ व २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक इएसटी. २०१८/प्र. क्र. ५६/कार्या-बारा, दिनांक २० जून २०१८ याद्वारे, दिनांक २३ जून २०१८ पासून कोरपना येथे नियमित न्यायालय म्हणून कार्य करण्यासाठी दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांचे न्यायालय स्थापन केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), कोरपना यांचे नियमित न्यायालय हे, संबंधित अधिकार क्षेत्रासाठी कार्य करीत असल्यामुळे, महाराष्ट्र शासनास, कोरपनाच्या पंचायत समिती क्षेत्राकरिताचे ग्राम न्यायालय कार्यरत असण्याचे बंद होईल, असा निदेश देणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याचे कलम २१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक २३ जून २०१८ पासून, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक सीआरसी-२००९/(३७)/कार्या-१२, दिनांक २९ सप्टेंबर २००९ विखंडीत करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अ. श्यां. कलोती,
शासनाचे सहसचिव.

IndiaCode